# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**ई-मेल :** akamrut@mahagenco.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## 'आजादी का अमृत महोत्सव' निमित्त महानिर्मिती कंपनीतर्फे सर्वांकरिता (खुलागट - राज्यस्तरीय) आयोजित विविध स्पर्धांबाबतची नियमावली.

------------------------------------------------------

**स्पर्धा क्र. १)** **<u>अभियांत्रिकी पदविका / पदवी / पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय संशोधनात्मक निबंध स्पर्धा</u> :- (विषय - वीज क्षेत्रातील अभियांत्रिकी स्थित्यंतरे / नवीन व नवीकरणीय अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामधील बदलते संशोधन)**

| अ.क्र. | गट | बक्षिसे | | |
|---|---|---|---|---|
| १) | पदविका / पदवी | प्रथम (रु. ३०,०००/-) | द्वितीय (रु. २०,०००/-) | तृतीय (रु. १०,०००) |

**स्पर्धेसाठी अटी व नियम :-**

१) निबंध हे शक्यतो स्व-हस्ताक्षरात व पानाच्या एकाच बाजूला लिहिलेला / टंकलिखित (डी.टी.पी. करून) असावा. निबंधाकरिता इंग्रजी / मराठी अथवा हिंदी भाषेचा वापर चालेल.

२) पहिल्या पानावरती स्पर्धकाचे नाव, संपूर्ण पत्ता पिनकोडसह, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक तसेच शैक्षणिक संस्थेचे नाव व अभ्यासक्रमाचे वर्ष याचा उल्लेख करावा. निबंध लेखन त्यापुढील पानापासून सुरु करावे.

३) निबंधाकरिता शब्दमर्यादा २००० असून शब्द मर्यादेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

४) निबंधामध्ये कॉपीराईट कायद्याचा भंग होणार नाही याची काळजी स्पर्धकांनी घ्यावी. यासंबंधीची सर्व जबाबदारी स्पर्धकावर राहील.

५) निबंध शिक्षण संस्थेच्या विभाग प्रमुख / प्राचार्य यांचेमार्फत अग्रेषित करण्यात यावेत, निबंध ई-मेलद्वारे पाठवायचे असतील तर त्यासोबत संस्थेचे स्वाक्षरांकित प्रमाणपत्र स्कॅनिंग करून पाठविणे.

६) निबंध हा प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टने किंवा रजिस्टर पोस्ट पोच पावतीसह / ई-मेल द्वारे दि. १५ एप्रिल २०२२ पर्यंत नमूद पत्त्यावर पाठवावा.

**स्पर्धा क्र. २)** **<u>राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा</u> :- (विषय - पर्यावरण संवर्धन / अपारंपरिक ऊर्जा )**

| अ.क्र. | गट | बक्षिसे | | |
|---|---|---|---|---|
| १) | शालेय गट (इयत्ता ७ ते १०) माध्यमिक | प्रथम (रु. १०,०००/-) | द्वितीय (रु. ५,०००/-) | तृतीय (रु. ३,०००) |
| २) | खुला गट | प्रथम (रु. २५,०००/- | द्वितीय (रु. १५,०००/-) | तृतीय (रु. १०,०००) |

**स्पर्धेसाठी अटी व नियम :-**

१) स्पर्धकांचे चित्र A4 किंवा A3 या दोन आकारात सादर करता येईल.

*(A4 आकार 210 × 297 मिलीमीटर किंवा 21 x 29.7 सेंटीमीटर किंवा 8.27 × 11.69 इंच आहे.)*

*(A3 आकार 297 x 420 मिलीमीटर किंवा 29.7 x 42.0 सेमी, 11.69 x 16.53 इंच)*

२) पेंटिंग्ज किंवा ड्रॉइंगसाठी आपण आपल्या पसंतीचे कोणताही माध्यम वापरू शकता. माध्यमांच्या वापरावर कोणतेही बंधन नाही. ते पेन्सिल, रंगीत पेन्सिल, ग्रेफाइट पेन्सिल, क्रेयॉन, पेस्टल, स्केचपेन, बॉलपेन, जेलपेन, शाईचे पेन, चारकोल, जलरंग, ॲक्रेलिक रंग किंवा तैलरंग असू शकतात.

३) रेखाचित्र किंवा चित्र कोणत्याही कागदावर करता येईल - ते कार्यालयीन लेखन पेपर किंवा ड्रॉइंग पेपर किंवा रेखाचित्र किंवा चित्रकला यासाठी योग्य इतर कागद असू शकतो. आपण कॅनव्हास देखील वापरू शकता. जर आपण कॅनव्हास वापरत असाल तर आपण stretching करण्यासाठी सर्व बाजूंनी २ इंचांचा मार्जिन सोडावा.

चित्राच्या समोरील बाजूस आपले पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता पिनकोडसह, मोबाईल नंबर तसेच ई-मेल आयडी लिहावा. (शालेय गटासाठी शाळेचे नाव, इयत्ता व गट क्रमांक इंग्रजी किंवा मराठी भाषेतच लिहावा.) सदर माहिती लिहिली नसल्यास चित्र परिक्षणासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.

४) सदर चित्र हे प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टने किंवा रजिस्टर पोस्ट पोच पावतीसह / ई-मेल द्वारे akamrut@mahagenco.in दि. १५ एप्रिल २०२२ पर्यंत नमूद पत्त्यावर पाठवावा.

**स्पर्धा क्र. ३)** **<u>राज्यस्तरीय खुली लघुपट / दर्जेदार मोबाईल क्लिप निर्मिती स्पर्धा</u> :- (कालावधी मर्यादा ५ मिनिट) (विषय - राष्ट्रनिर्मितीत महिलांचे योगदान / ऊर्जेचे अपारंपरिक स्त्रोत- नव संकल्पना / ऊर्जा आणि मानव)**

| **अ. क्र.** | **गट** | **सांघिक बक्षिसे** | | |
|---|---|---|---|---|
| १) | राज्यस्तरीय | प्रथम (रु. ३०,०००/-) | द्वितीय (रु. २०,०००/-) | तृतीय (रु. १०,०००) |

**<u>स्पर्धेसाठी अटी व नियम</u> :-**

१) लघुपट / मोबाईल क्लिप पाच मिनिट कालावधी पेक्षा जास्त लांबीची नसावी.

२) लघुपट / मोबाईल क्लिप संहितेचे लेखन, दिग्दर्शन, संगीत, प्रकाश या बाबी संबंधित स्पर्धकाने/संघातील सदस्यांनी करणे बंधनकारक आहे.

३) लघुपट / मोबाईल क्लिपचे सुरुवातीला महानिर्मिती लघुपट स्पर्धा हे टायटल असावे व त्यानंतर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाकरिता महाराष्ट्र शासनाने तयार केलेला लोगो असावा तर शेवटी स्पर्धकाचे नाव, संपूर्ण पत्ता पिनकोडसह, मोबाईल नंबर तसेच ई-मेल आयडी दर्शवावे.

४) लघुपटाची निर्मिती स्वतः केले असल्याचे तसेच संपूर्ण जबाबदारी घेत असल्याचे स्वहस्ताक्षर मध्ये सही सह प्रमाणपत्र जोडावे.

५) लघुपट / मोबाईल क्लिप बनवताना नग्नता, बिभत्सता, यांचा समावेश नसावा तसेच धार्मिक भावना, जाती-जमातीवर टीका टिपण्णीचा समावेश नसावा किंवा गोपनीयताचे उल्लंघन नसावे आणि कॉपीराईटचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यायची आहे. तसेच लघुपट /मोबाईल क्लिपमध्ये अवैध, अनैतिक तसेच सार्वजनिक हिताच्या विरूध्द कोणतेही घटक समाविष्ट नसावेत.

६) सदर लघुपट / मोबाईल क्लिप योग्य त्या Format मध्ये ई-मेल द्वारे (We Transfer ने akamrut@mahagenco.in या ई-मेल आय.डी. वर) दि. १५ एप्रिल २०२२ पर्यंत पाठवावेत.

**<u>निबंध / चित्र / लघुपट अथवा मोबाईल क्लिप पाठविण्याचा पत्ता</u> :**

**मुख्य जनसंपर्क अधिकारी (सांघिक नियोजन व सुसंवाद),**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,**
प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९,
प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००६६.
महाराष्ट्र.
ई-मेल आय.डी. : **akamrut@mahagenco.in**

**-: <u>महत्वाची सूचना</u> :-**

**वरील सर्व अटी व नियमांमध्ये मध्ये काही बदल करण्याचे वा अधिकच्या अटी व नियम नमूद करण्याचे अधिकार महानिर्मिती कंपनी राखून आहे.**

******